-: प्रेसनोट दिनांक- ०२/०९/२०२१ :-

नामदेव औदुंबर कचरे, वय ३६, पोलीस नाईक, ब.नं. ८३७, नेम. हातकणंगले पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर, रा.श्री. आडके यांचे घरी भाडयाने, राजपल्लु मंगल कार्यालयजवळ, उचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........

---

यातील तक्रारदार यांचे कौंटुबिक वादाबाबत मा. कौटुंबिक न्यायालय, धारवाड येथे केस चालु आहे. सदर केसचे सुनावणीमध्ये तक्रारदार हजर राहिले नसल्याने तेथील न्यायालयाने तक्रारदार यांचेविरूध्द अटक वॉरंट काढले होते. सदर अटक वॉरंटमध्ये अटक न करता मदत करणेसाठी हातकंणगले पोलीस ठाणेचे पोलीस नाईक कचरे यांनी तक्रारदार यांचेकडुन ३०००/- रू. लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दि. २९/०८/२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे लेखी तक्रार दिली आहे.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दि. २९/०८/२०२२ व दि. ३०/०९/२०२२ रोजी पोलीस नाईक कचरे यांचे लाच मागणीची पडताळणी केली असता, पोलीस नाईक कचरे यांनी तक्रारदार यांना त्यांचेविरूध्दचे अटक वॉरंटमध्ये अटक न करता मदत करणेसाठी २०००/- रू. लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे दि. ०२/०९/२०२२ रोजी हातकणंगले पोलीस ठाणे येथे सापळा कारवाई आयोजीत केली असता, पोलीस ठाणेचे बाजुस असलेल्या रेल्वे स्टेशनकडे जाणारे रोडचे कडेला पोलीस नाईक कचरे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच मागणी केलेप्रमाणे २०००/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडणेत आलेले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक नामदेव औदुंबर कचरे, वय ३६, पोलीस नाईक, ब.नं. ८३७, नेम. हातकणंगले पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर, रा. श्री. आडके यांचे घरी भाडयाने, राजपल्लु मंगल कार्यालयजवळ, उचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द हातकणंगले पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा.श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक नितीन कुंभार, श्रेणी पोसई संजीव बंबरगेकर, पोहेकॉ शरद पोरे, विकास माने, पोना सुनिल घोसाळकर, नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, रूपेश माने, चालक पोहेकॉ विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १/८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

५)हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४,

६) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner